# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

## नावाच्या पाट्या (Name Plate) व त्याकरिता आवश्यक असलेले ॲक्रलिक पारदर्शक बोर्ड पुरविण्याबाबत

विधान भवन, मुंबई येथील मा.पीठासीन अधिकारी, उप पीठासीन अधिकारी, विरोधी पक्ष नेते यांच्या नावाच्या/कार्यालयातील अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम असलेले, या सचिवालयातील अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम असलेले त्याचप्रमाणे विविध कक्षांची नावे असलेल्या नावाच्या मराठी अक्षरातील पाट्या (Name Plate) व त्याकरिता आवश्यक असलेले ॲक्रलिक पारदर्शक बोर्ड पुरविण्याच्या खालील कामांकरिता या क्षेत्रातील स्थानिक पुरवठादार/ठेकेदार यांचेकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | कामाचे स्वरुप | | दर |
|---|---|---|---|
| १. | १६' x ७.५' या आकाराची ५mm सनबोर्डवर एक बाजू व्हिनाईल लेटर असलेली नावाची पाटी (Name Plate) | :- | |
| २. | १६' x ७.५' या आकाराची ५mm सनबोर्डवर दोन बाजू व्हिनाईल लेटर असलेली नावाची पाटी (Name Plate) | :- | |
| ३. | १८' x १०' या आकाराची ५mm सनबोर्डवर एक बाजू व्हिनाईल लेटर असलेली नावाची पाटी (Name Plate) | :- | |
| ४. | १८' x १०' या आकाराची ५mm सनबोर्डवर दोन बाजू व्हिनाईल लेटर असलेली नावाची पाटी (Name Plate) | :- | |
| ५. | १०' x ०६' या आकाराची ५mm सनबोर्डवर एक बाजू व्हिनाईल लेटर असलेली नावाची पाटी (Name Plate) | :- | |
| ६. | १०' x ०६' या आकाराची ५mm सनबोर्डवर दोन बाजू व्हिनाईल लेटर असलेली नावाची पाटी (Name Plate) | :- | |
| ७. | १६' x ७.५' या आकाराचे ॲक्रेलिक पारदर्शक बोर्ड | :- | |

दरपत्रक सादर करताना GST नोंदणी प्रमाणपत्र, आधारकार्ड, पॅनकार्ड, दुकाने आस्थापना नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत तसेच वरील कामांचे दर सादर करण्यात यावे.

सदर कामाकरिता इच्छुक पुरवठादार/ ठेकेदारांनी आपले दरपत्रक मोहरबंद पाकीटातून सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई या पत्त्यावर दिनांक ९ जानेवारी, २०२६ रोजी किंवा तत्पूर्वी सायंकाळी ०४.०० वाजेपर्यंत पाठविण्यात यावे.

दरपत्रक स्वीकृत झाल्यास त्यानुसार आपणास कळविण्यात येईल. मात्र कोणतेही दरपत्रक स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा अधिकार या सचिवालयाने राखून ठेवला आहे. कृपया यांची नोंद घ्यावी, ही विनंती.

**सचिव-४,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**
**विधान भवन, मुंबई.**